देखभाल

# फुलपिकांवरील रोगांचा असा करा बंदोबस्त



**नीलिमा गोबाडे**
(पीएच. डी. स्कॉलर)
उद्यानविद्या विभाग,
वसंतराव नाईक महाराष्ट्र कृषी विद्यापीठ,
परभणी





फुलांच्या उत्पादनात भारतामध्ये महाराष्ट्र सर्वात आघाडीवर आहे. फूल उत्पादन अधिक किफायतशीर व गुणवत्तापूर्ण मिळण्यासाठी फुलपिकांचे रोग व्यवस्थापन खूप महत्त्वाचे आहे कारण रोगांचा प्रादुर्भाव झाल्यास फुलांची प्रत निकृष्ट होऊन बाजारभाव मिळत नाही. शिवाय उत्पादनात देखील मोठी घट येते. याकरिता फुलपिकांवर येणाऱ्या संभाव्य रोगांकरिता अगोदरपासून दक्षता घेऊन उपाययोजना केल्यास नुकसान टाळता येते.

फुलपिकांच्या रोगनियंत्रणाकरिता एकात्मिक रोग व्यवस्थापन पद्धतीचा वापर केल्यास रोगांचे नियंत्रण होऊन फुलांची गुणवत्ता वाढून उत्पादनात देखील वाढ होते. एकात्मिक रोग व्यवस्थापन पद्धतीमध्ये प्रामुख्याने तीन घटकांचे नियोजन केले जाते.

पिकांचे नियोजन, वातावरणाचे नियोजन व रोगकारक घटकांचे नियोजन

**पिकांचे नियोजन** : यामध्ये रोगप्रतिकारक वाणांची निवड करणे तसेच शिफारशीनुसार पिकांच्या वाढीच्या योग्य कालावधीत खतांची मात्रा देणे आणि प्रभावी बुरशीनाशकांचा वापर करून रोगप्रतिकारक क्षमता वाढवली जाते.

**वातावरणाचे नियोजन** : यामध्ये रोगाच्या वाढीस पूरक वातावरणाचे नियंत्रण करण्यासाठी पाण्याचे नियोजन, मातीचे नियोजन आणि पीक पद्धतीचे नियोजन येते.

**रोगकारक घटकांचे नियोजन** : रोगवाढीस पूरक घटकांचे प्रभावी नियंत्रण करणे म्हणजेच, रोगट पालापाचोळा गोळा करून जाळणे. तसेच नवीन रोगकारक घटकांचा शिरकाव होण्यापासून रोखणे.

**गुलाब** : या फुलपिकावर प्रामुख्याने भुरी, पानावरील काळे ठिपके आणि फांदीमर हे रोग जास्त प्रमाणात आढळून येतात.

**रोगाची लक्षणे** : नोव्हेंबर ते फेब्रुवारी या दरम्यान या भुरी रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात होतो. कोवळी पाने व कळीच्या देठावर पांढऱ्या बुरशीची वाढ झाल्यास पानांचा रंग तांबूस होतो. कोरड्या हवामानात पाने वेडीवाकडी येतात. थंड व कोरड्या हवामानात रोगाची तीव्रता वाढते.

**उपाय** : हरितगृहातील तापमान व आर्द्रतेचे योग्य नियंत्रण करावे. रोग येण्याअगोदर प्राथमिक फवारणी करावी. फुले काढल्यानंतर व छाटणी केल्यानंतर येणाऱ्या नवीन फुटीवर रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणावर होतो. रोगाची लागण दिसताच डायफेन्कॅनॉझोल ०.०५ टक्के या बुरशीनाशकाची नोव्हेंबर ते फेब्रुवारी या महिन्यात दहा दिवसांच्या अंतराने फवारणी करावी.

**शेंडेमर (फांदीमर)** : हा रोग डिप्लोडिया रोझरम व काळ्या बोट्रॉयॅटिस या विविध हानिकारक बुरशीमुळे होतो तसेच साचलेले जास्त पाणी, इतर रोग आणि किडींमुळे या रोगाच्या वाढीस पोषक वातावरण मिळून चालना मिळते.

**लक्षणे** : या रोगाची प्रमुख लक्षणे म्हणजे फांद्या शेंड्याकडून खालील बाजूस सुरवातीस पिवळ्या व नंतर काळ्या पडू लागतात व शेंड्याकडून खालील बाजूस वाळत येतात. विशेषतः छाटणीनंतर छाट घेतलेल्या कापापासून किंवा काढलेल्या कापापासून हानिकारक बुरशीचा प्रादुर्भाव होऊन फांद्या वाळत येतात. रोगाचा प्रादुर्भाव वाढल्यास तो कलमाच्या गाठीपर्यंत पसरून झाडे मरतात.

**उपाय** : रोगग्रस्त व वाळलेल्या जुनाट फांद्या, खवले कीडग्रस्त फांद्या वेळोवेळी छाटून नष्ट कराव्यात.

छाटणीनंतर लगेच कॅप्टन ०.२ टक्के किंवा मॅन्कोझेब ०.२५ टक्के यापैकी एका बुरशीनाशकाच्या दर १० दिवसांच्या अंतराने तीन फवारण्या कराव्यात.

**पानांवरील काळे ठिपके** : हा रोग डिप्लोकॉरपॉन रोझेसी या हानिकारक बुरशीमुळे होतो.

**लक्षणे** : पानांवर गडद तपकिरी ते काळसर गोलाकार ठिपके पडतात. रोगाचा प्रादुर्भाव सुरवातीस झाडांच्या खालील जुन्या पानांवर होतो व त्यानंतर तो वरील पानांवर पसरत जातो. या रोगाची सुरुवात पावसाळ्याच्या सुरुवातीस (जून-जुलै) होते व त्याची तीव्रता सप्टेंबर- ऑक्टोंबर या महिन्यात जास्त असते. रोगट झालेली पाने गळून पडतात व झाडाची उत्पादन व रोगप्रतिकारक क्षमता कमी कमी होत जाते. अशा झाडांच्या फुलांची प्रत कमी होते. हवेमध्ये जास्त आर्द्रता असल्यास या रोगाची तीव्रता वाढते. हा रोग उघड्यावरील गुलाबास जास्त प्रमाणात होतो. हरितगृहात या रोगाचे प्रमाण अत्यल्प असते.

**उपाय** : रोगट पाने गोळा करून जाळावीत. अतिदाट लागवड करु नये, तसेच पानांवर सतत पाणी पडणार नाही याची काळजी घ्यावी. याकरिता हरितगृहात गुलाबाची लागवड करावी. बागेमध्ये जास्त प्रमाणात पाणी साठू देऊ नये. हरितगृहातील आर्द्रतेचे योग्य नियंत्रण करावे. मॅन्कॉझेब ०.२५ टक्के बुरशीनाशक अधिक स्टीकर ०.१ टक्का या एकत्रित द्रावणाची दर १० दिवसांच्या अंतराने सप्टेंबर ते ऑक्टोबर या महिन्यात फवारणी करावी.

**जरबेरा** : या फूल पिकावर मुख्यत्त्वे मूळकुज किंवा खोडकूज, करपा, भुरी आणि केवडा हे बुरशीजन्य रोग आणि विषाणुजन्य रोग येतात.

**मूळकूज किंवा खोडकूज** : हा रोग रायझोक्टोनिया, फ्युजेरियम, पिथियम, फायटोप्थोरा या हानिकारक बुरशींमुळे होतो.

**लक्षणे** : जमिनीलगतच्या खोडावर वरील हानिकारक बुरशीची वाढ होऊन त्याठिकाणी खोडाचा भाग कुजतो आणि कालांतराने संपूर्ण झाड सुकते. हा रोग ऑगस्ट ते सप्टेंबर या कालावधीत जास्त प्रमाणात येतो.

**उपाय** : लागवडीपूर्वी जमीन ३ टक्के फॉरमॅलिनच्या द्रावणाने निर्जंतुक करावी आणि त्यावर गादीवाफे करून ७ ते १० दिवसांनी लागवड करावी. गादी वाफ्यावर जास्त प्रमाणात पाणी साठू देऊ नये, तसेच झाडाच्या खोड व मुळाभोवतालचा ओलावा कमी करावा. रोगाची लागण दिसू लागताच बेनोमिल ०.१ टक्का अधिक कॅप्टन ०.३ टक्का या बुरशीनाशकांच्या द्रावणाची दर ८ ते १० दिवसांचे अंतराने फवारणी करावी. तसेच बुंध्या शेजारी द्रावण ओतावे किंवा लागवड करतेवेळी १० ग्रॅम ट्रायकोडर्मा १ किलो कुजलेल्या शेणखतात मिसळून प्रति १० चौ.मी. क्षेत्रातील मातीत मिसळावे.